भारत निवडणूक आयोग
Election Commission of India

तुमचे नाव मतदार यादीमध्ये तपासा
1950<ECI>space<EPIC No.> वर एसएमएस करा किंवा elections24.eci.gov.in ला भेट द्यावी

#IVoteForSure
#MeraVoteDeshKeLiye



चुनाव का पर्व
DESH KA GARV
LOK SABHA ELECTION 2024

स्कॅन आणि डाऊनलोड करा
Voter Helpline App

CBC 52101/13/0009/2425

निसर्गात पुरेसा वेळ घालवल्याने हृदयरोग, मधुमेहाचा धोका कमी

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : निसर्गात पुरेसा वेळ घालवल्याने हृदयरोग, मधुमेहाचा धोका कमी होतो, असे एका अभ्यासात आढळून आले आहे. निसर्गात वेळ घालवल्याने त्यावेळेचा आनंद तुम्हाला मिळत असतो. यामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य चांगले राहते. याचा चांगला परिणाम दिसून येतो.

जर्नल ब्रेन, बिहेविअर आणि इम्युनिटीमध्ये प्रकाशित झालेल्या नवीन अभ्यासात म्हटले आहे की, तुम्ही जर निसर्गात पुरेसा वेळ घालवला तर हृदयरोग, मधुमेहाचा धोका कमी होतो. निसर्गाशी वारंवार संपर्क आल्याने सकारात्मकता वाढीला लागते. तुम्हाला चांगला आनंद मिळतो. चांगली झोप लागते आणि त्यांना तणाव कमी झाल्याचे दिसून आले.

नॉर्विच मेडिकल स्कूलच्या एका टीमच्या नेतृत्वाखाली केलेल्या अभ्यासात असे आढळून आले की, निसर्गाच्या संपर्कात राहिल्याने टाइप २ मधुमेह, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, उच्च रक्तदाब आणि मुदतपूर्व जन्म यांसारख्या परिस्थितींचे धोके कमी होऊ शकतात.

तसेच अमेरिकेतील कॉर्नेल विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागाच्या अभ्यासकाच्या टीमने म्हटले आहे की, निसर्गामुळे आरोग्य का सुधारू शकते याचे जैविक स्पष्टीकरण प्रदान करते. निसर्गातून आनंद मिळतो. त्यामुळे हृदयविकार आणि मधुमेहाचा धोका कमी होण्यास मदत होते. अभ्यासासाठी टीमने १,२४४ लोकांना सहभागी करून घेतले होते. आरोग्यासाठी मूल्यांकनासाठी शारीरिक तपासणी, लघवीचा नमुना आणि उपाशीपोटी सकाळी रक्ताची तपासणी केली. त्यांच्यात चांगला परिणाम दिसून आला.

विरार - अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका ९८ किमीचीच

उर्वरित भाग कोकण द्रुतगती महामार्ग प्रकल्पात समाविष्ट

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) १२८ किमी लांबीचा विरार - अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका प्रकल्प हाती घेतला आहे. बलवली - अलिबाग दरम्यानचा २९.९०० किमी लांबीचा दुसरा टप्पा कोकण द्रुतगती महामार्ग प्रकल्पात समाविष्ट करण्यात येणार असून या प्रकल्पाअंतर्गतच या टप्प्याचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे आता बहुउद्देशीय मार्गिका ९८ किमीची असणार आहे.



विरार - अलिबाग बहुउद्देशीय हा प्रकल्प नवघर - बलवली आणि बलवली - अलिबाग अशा दोन टप्प्यांत राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पण आता मात्र नवघर - बलवली दरम्यानचा ९८.५०० किमीचा पहिला टप्पा एमएसआरडीसीने बहुउद्देशीय मार्गिकेअंतर्गत पूर्ण केला आहे. दरम्यान नवघर - बलवली मार्गिकेच्या कामासाठी ३३ निविदा सादर झाल्या असून जूनमध्ये निविदा अंतिम करून २०२५ च्या सुरुवातीला मार्गिकेच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाण्याची शक्यता आहे. ही मार्गिका २०२८-२९ मध्ये पूर्ण होण्याची शक्यता आहे. महानगर प्रदेशातील कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी, विरार - अलिबाग अंतर कमी करण्यासाठी विरार - अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका बांधण्याचा निर्णय घेतला.

माथेरानमध्ये ई-रिक्षा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



मुंबई : पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या माथेरानमध्ये ई-रिक्षा सुरू करण्यास सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला परवानगी दिली आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात २० रिक्षा सुरू कराव्यात आणि या रिक्षा हातरिक्षा चालकांनाच द्याव्यात, असे आदेशही न्या. भूषण गवई आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठाने दिले आहेत.

गेल्या ६५ वर्षांपासून पायपीटचा अतोनात त्रास सहन करणाऱ्या माथेरानवासीय तसेच लाखो पर्यटकांना मोठा दिलासा मिळाला आहे. माथेरान पर्यटनस्थळी केवळ रुग्णवाहिका, घनकचरा उचलण्यासाठी ट्रॅक्टर आणि हातरिक्षा वगळता कोणत्याही वाहनाला प्रवेश नाही. त्यामुळे सगळ्यांनाच पायपीट करावी लागत होती. अमानवीय प्रथा दूर करून शहरात ई- रिक्षाला परवानगी द्यावी यासाठी सुनील शिंदे यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल होती. टाटा समाज विज्ञान संस्थेच्या अहवाल प्राप्त झाल्यानंतर सरकारने तो ऑक्टोबर २०२३मध्ये सर्वोच्च न्यायालयात सादर केला होता.

उन्हाळ्यात शोधा गारवा
शरीराला आतून द्या थंडावा

डोळे कोरडे होणे | डोळे लाल होणे | शरीराला खाज येणे
बर्निंग सेन्सेशन | लघवीला होणारी जळजळ | डोकेदुखी

हे टाळण्यासाठी नेहमी हायड्रेटेड रहा
तन्वीशता टॅबलेटस्



2 गोळ्या दररोज
केमिस्टकडे उपलब्ध

तन्वी क्लिनिक - रोज फ्री चेकअप - ठाणे / दादर : 9769695892 | फ्री व्हाट्सअप सल्ला : डॉ. मानसी : 9137231554

'यूटीएस ॲप'द्वारे तिकिटांसाठीची बाह्य मर्यादा रद्द

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : रेल्वे मंडळाने मंगळवारी यूटीएस ॲपद्वारे पेपरलेस तिकीट काढण्यासाठी बाह्य मर्यादेचे बंधन रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे लोकल आणि एक्स्प्रेसचा प्रवासी कोणत्याही ठिकाणाहून पेपरलेस तिकिटे काढू शकणार आहे. हा मोठा बदल झाल्याने रेल्वे प्रवाशांना खूप मोठा दिलासा मिळाला आहे.

यूटीएस ॲपद्वारे दररोज लाखो प्रवासी रेल्वेची तिकिटे काढत असून प्रवासी वर्गाचा सकारात्मक प्रतिसाद यूटीएस ॲपबाबत आहे. मात्र, यूटीएस ॲपद्वारे लोकलचे तिकीट काढताना रेल्वे परिसरापासून २० किमी आणि रेल्वे गाडीचे तिकीट काढताना ५० किमी अंतर राखण्याची मर्यादा होती. परंतु आता प्रवाशांच्या सोयी वाढवण्याच्या आणि तिकीट प्रक्रिया व्यवस्थित करण्याच्या उद्देशाने रेल्वे मंडळाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

अंतर्गत मर्यादेच्या नियमांत बदल नाही!

यूटीएस ॲपद्वारे लोकल, रेल्वेगाडीचे तिकीट काढण्याची सोय आहे. तसेच फलाट तिकीटदेखील काढू शकतो. तथापि, अंतर्गत मर्यादेच्या नियमांत कोणताही बदल केलेला नाही. फक्त रेल्वे स्थानक परिसराबाहेर तिकिटे कढण्याची परवानगी आहे. गाडीत किंवा स्थानकात असताना, तकीट काढता येणार नाही.

रणवीर 'डीपफेक' प्रकरणात गुन्हा

मुंबई: अभिनेता रणवीर सिंह याच्या डीपफेक चित्रफीतप्रकरणी महाराष्ट्र सायबर पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला. रणवीरच्या वडिलांच्या तक्रारीवरून या प्रकरणी एक्स या समाजमाध्यमावरील एका खातेधारकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी महाराष्ट्र सायबर अधिक तपास करत आहे.

तक्रारीनुसार रणवीर सिंह याने १४ एप्रिलला एका फॅशन शोमध्ये सहभागी होण्यासाठी वाराणसीला भेट दिली होती. त्या वेळी एका वृत्तवाहिनीद्वारे त्याची मुलाखत घेतली. त्याचा व्हिडीओ अपलोड केला. त्यात डीपफेकद्वारे रणवीरचा आवाज वापरून नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली होती.

क्रेडीट सुईस फायनान्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड

नोंद. कार्यालय : ९वा मजला, सीजे हाऊस, प्लॉट एफ, शिवसागर इस्टेट, डॉ. ॲनि बेजंट रोड, वरळी, मुंबई, महाराष्ट्र – ४०००१८.
दू. क्र. : ९१ – २२ – ६७७७ ३४००,
ई-मेल :somanathan.viswanathan@credit-suisse.com,
संकेतस्थळ : https://www.credit-suisse.com/in/en/private-finance.html

संयुक्त सार्वजनिक सूचना

(आरबीआय मास्टर डायरेक्शन क्र. आरबीआय/डीओआर/२०२३-२४/१०६ मास्टर डीओआर.एफआयएन.आरईसी. क्र. ४५/०३.१०.११९/२०२३-२४ दिनांक १९ ऑक्टोबर, २०२३ च्या अनुसार)

१. सदर सूचना (१) क्रेडीट सुईस फायनान्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत स्थापित कंपनी, ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय ९वा मजला, सीजे हाऊस, प्लॉट एफ, शिवसागर इस्टेट, डॉ. ॲनि बेजंट रोड, वरळी, मुंबई, महाराष्ट्र – ४०००१८ येथे आहे (''**कंपनी**'') आणि संदर्भ क्र. बी-१३.०१९५१ धारक २६ ऑक्टोबर, २००९ नोंदणीच्या प्रमाणपत्रांच्या अटीमध्ये ठेवी न घेणारी पध्दतशीरपणे महत्वाची बिगर-बँकींग वित्तीय कंपनी म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे (''**आरबीआय**'') नोंदणीकृत आहे, आणि (२) यूबीएस एजी (''**यूबीएस**''), जी स्टॉक कंपनी आहे, बान्हॉफस्ट्रास ४५, सीएच-८००१ झूरीच, स्वीत्झरलँड आणि ॲस्चेनव्होरस्टेड १, सीएच-४०५१ बॅसेल, स्वीत्झरलँड येथील दोन कार्यालयांसह स्वीत्झरलँडच्या कायद्यांतर्गत शेअर्सद्वारे स्थापित कॉर्पोरेट लिमिटेड आहे, यांच्याद्वारे संयुक्तपणे वितरीत करण्यात आली आहे. ही सूचना आरबीआयद्वारे वितरीत संदर्भ क्रमांक आरबीआय/डीओआर/२०२३-२४/१०६ मास्टर-डायरेक्शन डीओआर.एफआयएन.आरईसी क्र. ४५/०३.१०.११९/२०२३-२४ दिनांकित १९ ऑक्टोबर, २०२३ धारक मास्टर – डायरेक्शन – रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नॉन-बँकींग फायनान्शीयल कंपनी-स्केल बेस्ड रेग्यूलेशन) डायरेक्शन, २०२३ (''**आरबीआय मास्टर डायरेक्शन्स**'') अनुसार वितरीत करण्यात आली आहे.

२. क्रेडीट सुईस एजी (''**सीएस एजी**'') चे यूबीएस एजी जीवित अस्तित्व म्हणून यूबीएस एजी सोबत आणि मध्ये त्वरीत वैधानिक विलिनिकरणाच्या अनुषंगाने, सामावून घेणारे (जीवित) अस्तित्व म्हणून असलेल्या यूबीएस एजी सोबत स्वीस विलिनिकरण कायद्यांतर्गत सामावून घेण्याद्वारे तथाकथित विलिनिकरणाच्या मार्गाने यूबीएस एजी मध्ये सीएस एजी विलिन होईल आणि विलिनिकरण पूर्ण झाल्यानंतर सामावून घेतली जाणारे अस्तित्व असलेली सीएस एजी चे अस्तित्व बंद होईल. याचा परिणाम म्हणून बंद झाल्यावर, यूबीएस एजी ही क्रेडीट सुईस इन्व्हेटमेंट होल्डींग (मॉरीशस) लिमिटेडचे पालक होतील, जे सीएस फायनान्सचे पालक होतील. हे लक्षात घेता, पेरेंट बँक विलिनिकरणाच्या अनुषंगाने, यूबीएस एजी ही सीएस फायनान्स मध्ये अप्रत्यक्ष शेअरहोल्डींगचे १००% संपादित करतील (''**प्रस्तावित व्यवहार**''). सीएस फायनान्सची मूलत: होल्डींग कंपनी ही सध्याची वास्तवित स्थित अनुसार यूबीएस ग्रुप एजी म्हणून राहील.

३ आरबीआय मास्टर डायरेक्शन्सच्या सेक्शन ।।/ च्या परिच्छेद ४२ सहवाचित सेक्शन ।।। अंतर्गत आरबीआयने १३ मार्च, २०२४ दिनांकीत पत्रान्वये प्रस्तावित व्यवहार अभिलेखावर घेतला आहे.

४. सदर सूचनेचा उद्देश पेरेंट बँक विलिनिकरणाचा निष्कर्ष म्हणून कंपनीच्या शेअरहोल्डींगमधील प्रस्तावित प्रत्यक्ष बदलाची सूचना जनतेला देणे हा आहे.

५. जर कोणतेही स्पष्टीकरण आवश्यक असल्यास, त्याकरिता श्री. सोमनाथन विश्वनाथन (कंपनी सचिव) यांना कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयामध्ये (उक्त दिलेल्या) किंवा त्यांच्या ई-मेल somanathan.viswanathan@credit-suisse.com वर सदर सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसात संपर्क करा.

सदर सार्वजनिक सूचना कंपनी आणि यूबीएसद्वारे संयुक्तपणे प्रकाशित करण्यात आली आहे.

क्रेडीट सुईस फायनान्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड करता
हस्ता/-
अधिकृत स्वाक्षरीकर्ते

स्थळ : मुंबई
दिनांक : २३.०४.२०२४

सलमान खानच्या घरावरील गोळीबार प्रकरण

दोन पिस्तुलांसह १७ काडतुसे जप्त

लोकसत्ता खास प्रतिनिधी

मुंबई : अभिनेता सलमान खान याच्या घराजवळ झालेल्या गोळीबारप्रकरणी गुन्हे शाखेला दोन पिस्तुलांसह तीन मॅगझीन व १७ काडतुसे जप्त करण्यात यश आले आहे. आरोपींनी गोळीबारानंतर दोन्ही पिस्तुले तापी नदीत फेकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी आरोपींनी वापरलेला एक मोबाइलही गुजरातमधून यापूर्वीच हस्तगत करण्यात आला होता.

दोन दुचाकीस्वारांनी १४ एप्रिलला सलमान खान याच्या वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटजवळ पाच गोळ्या झाडल्या होत्या.

स्वाती म्हसे-पाटील यांची नियुक्ती

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी प्रशासकीय अधिकारी स्वाती म्हसे-पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी गुरुवारी व्यवस्थापकीय संचालकपदाची सूत्रे स्वीकारली.

पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर महामंडळाच्या पायाभूत सुविधांच्या कामाला प्राधान्य देणार आहोत. तसेच चित्रीकरणाची संख्या वाढविण्याबरोबरच निर्मात्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे स्वाती म्हसे-पाटील यांनी सांगितले. अधिकारी-कर्मचाऱ्यांचेही प्रलंबित प्रश्न मार्गी लावून कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

लाचप्रकरणी अन्नसुरक्षा अधिकाऱ्याविरोधात गुन्हा

ठाणे : वसंत विहार भागात टपरीवर कारवाई केल्यानंतर ही टपरी पुन्हा सुरू करण्यासाठी लाचेची मागणी करणाऱ्या राजू आकरूप या अन्नसुरक्षा अधिकाऱ्याविरोधात चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात रोहन मोदी या व्यक्तीला लाचेप्रकरणात अटक करण्यात आल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून देण्यात आली. तक्रारदार हे ठाण्यात राहत असून काही दिवसांपूर्वी त्यांच्या टपरीवर गुटख्याची विक्री होत असल्याने त्यांची टपरी बंद करण्यात आली होती. ही टपरी पुन्हा सुरू करण्यासाठी आकरूपे यांनी पाच हजारांची मागणी केली होती.

LONG TERM SUBORDINATED BONDS (LTSB) - SERIES 2



8.50%* p.a.
Interest payable quarterly.
ISSUE : 100 CRORES
PERIOD : 10 YEARS
Issue open upto : 15th May 2024
*Terms & Conditions Apply.

SVC CO-OPERATIVE BANK LTD. (Multi-State Scheduled Bank) ESTD.1906
HUM SE HAI POSSIBLE
(Formerly The Shamrao Vithal Co-op Bank Ltd.)

To apply, contact nearest Branch or call
+91 22 6699 9772 / 9859



दिल्ली महानगरपालिका
(पथकर विभाग)

क्र.एडीसी/टीटी/एचक्यू/२०२४/डी-८० दिनांकित : १८.०४.२०२४

जाहीर लिलाव सूचना

कसूरदार माजी पथकर कंत्राटदार मे. एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लि. यांच्या मालकीच्या मुंबई येथे स्थित पुढील सरकारजमा स्थावर मालमत्तांचा खुला जाहीर लिलाव **०७.०५.२०२४ रोजी सकाळी ११ वाजता** तहसीलदार कुर्ला (मुलुंड), (पत्ता : बी१, ४०६, बुमरँग, चांदिवली स्टुडिओ, चांदिवली फार्म रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई महाराष्ट्र ४०००७२) द्वारा नियोजिण्यात आला आहे. सर्व इच्छुक पक्षकारांना विनंती करण्यात येते की नियत तारखेला व वेळी त्या स्थळी लिलावास उपस्थित राहावे.

अनु. क्र.	मालमत्ता	शासकीय रक्कम (किमान राखीव किंमत)
१	ब्लॉक नं. ४०८, बुमरँग बिल्डिंग, चांदिवली फार्म रोड, अंधेरी (पूर्व) आणि लेक होम, पवई, मुंबई, महाराष्ट्र - ४०००७२	८,५०,५८,०००/-
२	ब्लॉक नं. ४०९, बुमरँग बिल्डिंग, चांदिवली फार्म रोड, अंधेरी (पूर्व) आणि लेक होम, पवई, मुंबई, महाराष्ट्र - ४०००७२	८,५७,१७,०००/-
३	ब्लॉक नं. ४१०, बुमरँग बिल्डिंग, चांदिवली फार्म रोड, अंधेरी (पूर्व) आणि लेक होम, पवई, मुंबई, महाराष्ट्र - ४०००७२	६,४८,८२,०००/-
४	क्र. बी १,४०६, बुमरँग चांदिवली स्टुडिओ, चांदिवली फार्म रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई, महाराष्ट्र - ४०००७२	६,४५,९६,०००/-

अधिक तपशील जसे की लिलावाची पद्धत, मालमत्तेच्या लिलावाच्या अटी व शर्ती इत्यादीकरिता कृपया महापालिकेच्या वेबसाइटवर https://mcdonline.nic.in मध्ये टेंडर टॅबवर अपलोड केलेली तहसीलदार कुर्ला (मुलुंड) कार्यालयद्वारा प्रसारित कागदपत्रे/ लिलावाची सूचना पाहा.

(सुमित कुमार, आयओएफएस)
अपर उपायुक्त (पथकर)
दिल्ली महानगरपालिका

आरओ क्र.०२/डीपीआय/एमसीडी/२०२४-२५

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड
एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ई-मेल: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: www.mcxccl.com

३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या तिमाही व वार्षिक लेखापरिक्षित आर्थिक परिणामांचे सार (₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३१ मार्च २०२४ लेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ डिसेंबर २०२३ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ मार्च २०२३ लेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०२४ लेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०२३ लेखापरीक्षित
१. प्रचालनातून एकूण उत्पन्न	४,३६०	४,७८९	३,२८४	१६,७३६	११,७५९
२. कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींपूर्वी)	२,४२८	२,२९४	(४५०)	३,२८२	२,४१०
३. कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	२,४२८	२,२९४	(४५०)	३,२८२	२,४१०
४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	२,४०५	२,२९४	(४५१)	३,२५९	२,४०२
५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न/(तोटा) [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	२,४०५	२,२९६	(४४८)	३,२४२	२,४००
६. समभाग भांडवल (₹१०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	-	-	-	(१६,८६८)	(११,६०४)
८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी)* मूलभूत व सौमिकृत (₹)	१.००	०.९६	(०.१९)	१.३६	१.००

** अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.*

नोंद:
१. वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.
२. वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीकडून दिनांक दिनांक २३ एप्रिल २०२४ रोजी केले गेले आहे आणि दिनांक २३ एप्रिल २०२४ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत त्यांना मान्यता मिळाली आहे.

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
नरेंद्र कुमार अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ: मुंबई | दिनांक: २३ एप्रिल २०२४